सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपासः-
मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,
माझे नावः - सुरेश तोलाजी वैरागर,
वय - ४० वर्षे, व्यवसाय- मजुरी,
राहणार - सोनई, ता.नेवासा, जि. अहमदनगर.
अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.पी.औताडे यांचे मार्फत सुरुः-

१. पोलिसांनी मला पोलिस स्टेशनला बोलवले होते. तेथे पोलिसांनी माझी को-या कागदावर सहया घेतली. (आता मला प्रस्तुत कामातील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला) त्या घटनास्थळ पंचनाम्यावर माझी सही आहे. त्यामध्ये काय लिहिले आहे हे मला माहित नाही. सहीस निशाणी १२ देण्यात येते. पोलिसांनी माझ्या समक्ष काहीही जप्त केलेले नव्हते.

साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली. वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली.

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २९/०४/२०२४ रोजी पोलिसांनी मला सोनई पोलिस स्टेशनमध्ये बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, तिथे पोलिसांनी मला सांगितले की, बाळासाहेब ब्रामणे हा त्याच्या घराच्या आडोशाला गावटी हातभट्टी तयार करत आहे, आता गेल्यास मिळुन येईल असे सांगितले तरी तुम्ही पंच म्हणून बरोबर चला. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी, पोलिस व दुसरे पंच आरोपीच्या रहात्याघरी गेलो व तिथे आम्ही छापा टाकला. हे म्हणणे खरे नाही की, तिथे आरोपीच्या ताब्यात २०० लिटरचे हातभट्टीचे कच्चे रसायन प्लॅस्टीकच्या बॅलरमध्ये मिळुन आले. हे म्हणणे खरे नाही की, ४०० लिटर हातभट्टीची गावटी दारु एका प्लॅस्टीकच्या ड्रममध्ये मिळुन आली. हे म्हणणे खरे नाही की, १८० मिलीचे दारुचे रसायन एका बॅाटलमध्ये काढुन ते रासायनीक विश्लेषणासाठी बाजुला काढुन घेतले. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर पोलिसांनी माझ्या समक्ष घटनास्थळाचा व जप्तीचा पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, सदर पंचनामा पोलिसांनी मला वाचुन दाखविला व त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष दिली.

उलटतपास आरोपीतर्फे ॲड. पी.सी.नहार यांनी नाकारला-

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/-
(ए.एन.सरक)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,
नेवासा

दिनांक- २१/०३/२०२५.